छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) अधिनस्त विभागीय कार्यालय, पुणे कार्यालयातील गट शिक्षणाधिकारी (वर्ग-२) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत..
श्रीमती साधना तुकाराम पाचपुते,राज्यकर अधिकारी

# महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
## शासन आदेश क्र. सारथी-२०२५/प्र.क्र.०९/का.१४२५-अ

मादाम कामा रोड, राजगुरू हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२५**

वाचा : १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.सारथी-२०२२/प्र.क्र.५६/का.१४२५-अ, दि.१४.०६.२०२२
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दि.१७.१२.२०१६
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्यासन-१२, दि.१६.०२.२०१८
४) शासन पत्र,वित्त विभाग, क्र.विकअ-१०२५/प्र.क्र.१७/वि.प्र.-२, दि.०१.१०.२०२५

**शासन आदेश :-**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या कार्यालयातील गट शिक्षणाधिकारी (वर्ग-२) (वेतन स्तर एस-१७: ४७६००-१५११००) या रिक्त पदावर सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून श्रीमती साधना तुकाराम पाचपुते, राज्यकर अधिकारी (वर्ग-२) यांची प्रतिनियुक्तीने शिक्षण विभागाकडून गट-शिक्षणाधिकारी वर्ग-२ या पदावर नियुक्ती होईपर्यंत प्रथमत: एका वर्षासाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

(१) श्रीमती साधना तुकाराम पाचपुते,राज्यकर अधिकारी यांची उक्त पदावरील प्रतिनियुक्ती त्या ज्या दिवशी सदर पदावर रुजू होतील त्या दिवसापासून प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सदर पदावर शिक्षण विभागाकडून नियमित अधिकारी उपलब्ध होईपर्यंत किंवा विभागाच्या पुढील आदेशापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल. प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी त्यांच्या मूळ विभागामध्ये रुजू होणे आवश्यक राहील

(२) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

(३) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिका-याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

(४) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिका-याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

(५) श्रीमती साधना तुकाराम पाचपुते, राज्यकर अधिकारी यांना उपरोक्त प्रतिनियुक्तीच्या कालावधीत प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

(६) श्रीमती साधना तुकाराम पाचपुते, राज्यकर अधिकारी यांनी प्रतिनियुक्तीचे प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर तात्काळ प्रतिनियुक्तीच्या कार्यालयात रुजू व्हावे. त्यासाठी त्यांना पदग्रहण अवधी, प्रवास खर्च इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

(७) उपरोक्त प्रतिनियुक्तीच्या कालावधीत श्रीमती साधना तुकाराम पाचपुते,राज्यकर अधिकारी यांना अनुज्ञेय असलेल्या रजा, गट विमा योजना, वैद्यकीय सवलत, रजा प्रवास सवलत इत्यादी सेवाविषयक बाबींच्या संदर्भात त्यांना त्यांच्या मूळ विभागातील सेवाविषयक नियम लागू राहतील.

(८) श्रीमती साधना तुकाराम पाचपुते,राज्यकर अधिकारी यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी वित्त विभागामार्फत हाताळण्यात येतील.

२. श्रीमती साधना तुकाराम पाचपुते,राज्यकर अधिकारी यांना छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या कार्यालयातील गट शिक्षणाधिकारी (वर्ग-२) या पदावर रुजू होण्याकरीता राज्यकर आयुक्त यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक क्र.२०२५१०२७१८३०४५५४१६ असा आहे. हे आदेश डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK BANSI GAIKWAD

Digitally signed by VIVEK BANSI GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=2dcd8a369b90c95da2ba1482ac5185a9b5d5d8a62596d71411bc96a1a7d9bad5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1ECC1A130CD0429F39A57C63D4B57C6C3ACFCA13C103BFF9F5EF5D51BD17AD08, cn=VIVEK BANSI GAIKWAD
Date: 2025.10.27 18:32:29 +05'30'

**( विवेक ब गायकवाड )**
**सह सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई.
५. राज्यकर आयुक्त,महाराष्ट्र राज्य, वस्तु व सेवाकर भवन,माझगाव,मुंबई
६. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा ), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. अधिदान व लेखा अधिकारी,पुणे
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,पुणे
१०. श्रीमती साधना तुकाराम पाचपुते, राज्यकर अधिकारी
११. कक्ष अधिकारी , वित्त विभाग/वि.प्र.-२,नवीन प्रशासन भवन,मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (का.१४२५-अ)